महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
ग्रामपंचायतींना अग्रिम निधी देणे.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१०

शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : मग्रारोहयो २०१०/प्रक्र ११/रोहयो-१४,

वाचा :- १) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा - २००५
२) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा मार्गदर्शक सूचना २००६,
३) शा.नि.नि.वि.क्र.रोहयो २००५/प्र.१०४/रोहयो-१०,दि. २३ डिसेंबर, २००५,
४) शा.नि.नि.वि.क्र.रोहयो २००५/प्रक्र १/रोहयो - १०, दि. २ ऑगस्ट, २००६,
५) शा.नि.क्र.मग्रारोहयो २००८/प्रक्र.३/रोहयो - १०,दि. ५.६.२००८.

**प्रस्तावना :-** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी राज्यात दिनांक ०१.४.२००८ पासून एकुण ३३ जिल्ह्यात सुरु असून, योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र तसेच राज्यशासनाकडून प्राप्त झालेला निधी केंद्रशासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी यांच्या नावे ठेवावयाचा असून, सदर निधी तालुका तसेच ग्रामपंचायत स्तरावर ठेवण्याबाबत वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत.

२. शासन निर्णय दिनांक ०२.०८.२००६ अन्वये उपलब्ध निधीच्या ५०% निधी ग्रामपंचायत स्तरावर देण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या व त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही केलेली होती. अनेक ग्रामपंचायतीमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोहयो अंतर्गत कामे सुरु नसल्याने तसेच काही ग्रामपंचायतीमध्ये कमी प्रमाणात कामे सुरु असल्याने बराचसा निधी ग्रामपंचायत स्तरावर पडून राहिल्याने ज्या ग्रामपंचायतीमध्ये निधीची आवश्यकता आहे, अशा ग्रामपंचायतींना वेळीच निधी उपलब्ध होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. ग्रामपंचायतीकडील अखर्चित असलेला निधी पुन्हा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्याकडे वर्ग करण्यात अडचणी असल्याचेही शासनाच्या निदर्शनास आले आहे. या बाबीचा विचार करुन प्रशासकीय व आर्थिक शिस्तीचे पालन होण्याच्या दृष्टीने राज्य शासनआता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :-** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना अंतर्गत ग्रामपंचायतींना अग्रीम निधी देण्याबाबत दिनांक ०२.०८.२००६ व ०५.०६.२००८ मधील अग्रिम निधी देण्याबाबतच्या तरतुदी अधिग्रहीत करण्यात येत आहेत.

केंद्र तसेच राज्यशासनाकडून जिल्हयाला प्राप्त झालेल्या निधीपैकी राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यासाठी आवश्यक इतकाच निधी ग्रामपंचायतीकडे देण्यात यावा. ग्रामपंचायत तसेच यंत्रणांना अग्रिम निधी देण्यात येऊ नये. तहसिलदार, गट विकास अधिकारी यांचे स्तरावर आवश्यकतेप्रमाणे अग्रिम निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. ज्या जिल्हयामध्ये पोस्टामार्फत अथवा बँकेमार्फत मजूरीचे प्रदान होत आहे, अशा जिल्हयांकडे पोस्ट ऑफिसचे तसेच बँकेचे स्तरावरही अग्रिम निधी उपलब्ध ठेवण्यास हरकत नाही.

ग्रामपंचायत तसेच यंत्रणा स्तरावर अग्रिम निधी उपलब्ध ठेवण्यात आलेला नसल्याने याबाबत केंद्र शासनाच्या Operational Guidelines २००८, परिशिष्ट ७.१.५ नुसार मजूरी तसेच Material बाबतचे प्रदान केंद्र शासनाने नमूद केलेल्या वेळेत होण्याची जबाबदारी तहसिलदार / गट विकास अधिकारी यांची राहील.

ज्या जिल्हयामध्ये ग्रामपंचायतीकडे अधिक निधी शिल्लक आहे, अशा जिल्हयांबाबत जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हा अधिकारी यांनी ग्रामपंचायतीकडे अतिरिक्त असलेला निधी तातडीने वर्ग करुन घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. ना.को.भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
o/c

प्रति,
प्रधानसचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
विभागीय आयुक्त, सर्व
जिल्हाधिकारी ( मुंबई / मुंबई उपनगरे वगळून ) सर्व,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सर्व,
सर्व उप सचिव, अवर सचिव, (रोहयो),
सर्व कार्यासन अधिकारी (रोहयो),
कक्ष अधिकारी, रोहयो-१, पुस्तक छपाईसाठी,
निवडनस्ती, रोहयो - १४.

नियोजन विभाग
निर्गमित
यादीप्रमाणे
सही 30 NOV 2010 सही
अनु. क्रमांक 2E44

Gr. 27.10..2010.lwp C:\Documents and Settings\Mr.Umale\Desktop